# संपादकीय
# मराठीतील दिवाळी अंकाचा शतकमहोत्सव आणि 'मनोरंजन'कार काशिनाथ रघुनाथ मित्र आजगांवकर



मराठी भाषा साहित्य आणि संस्कृतीमध्ये दरवर्षी दीपोत्सवाच्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांना मोठे मानाचे स्थान आहे. या दिवाळी अंकाची सुरुवात सन १९०९ साली काशिनाथ रघुनाथ मित्र आजगांवकर यांनी 'मनोरंजन'चा दिवाळी अंक १९०९' असे लिहून केली आणि दिवाळी अंकाला मराठी भाषेत मानाचे स्थान प्राप्त करून दिले. म्हणून यंदाचा २००८ चा दिवाळी अंक हा १०० वा दिवाळी अंक होय. मराठी भाषेत आज सुमारे चारशे/साडेचारशे दिवाळी अंक प्रकाशित होतात. ह्या शतकमहोत्सवी दिवाळी अंकाच्या निमित्ताने कै. काशिनाथ रघुनाथ मित्र आजगांवकर ह्या मराठी भाषेला भूषणावह असलेल्या व्यक्तित्त्वाची माहिती प्रकाशमान झाली आणि त्या काळातील मराठी वाङमयीन लेखन-कवींचे स्मरण महाराष्ट्राला पुन्हा झाले हे काही कमी महत्त्वाचे नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आजगांव हा परशुरामभूमी कोंकणातील एक गांव असून तो आद्यग्राम ह्या मूळ संस्कृत नांवाचे रूप असल्याचे म्हटले आहे. कोकणची भूमी ही कर्तबगार महाराष्ट्रीयांची खाण असून अनेक कर्तबगार थोर पुरुष ह्या भूमीने महाराष्ट्राला दिले आहेत.



कुशाग्रबुद्धी, निसर्गप्रेम, श्रमसातत्याची चिकाटी, महत्त्वाकांक्षा, भांडकुदळपणात जमा होणारा निर्भीड फटकळपणा आणि आपत्तीशी सदैव झुंज देण्याची तयारी इत्यादी वैशिष्ट्ये असणारी अनेक नररत्ने या भूमीत जन्माला आली. त्यापैकीच मनोरंजनकार का. र. मित्र आजगांवकर, महाराष्ट्र-भाषा-भूषण ज. र. आजगांवकर आणि इतिहासकार-पत्रकार-लेखक-कवी म्हणून प्रसिद्ध असलेले गुं. फ. आजगांवकर या आजगांवच्या पुरुषरत्नांचा समावेश त्यात आहे.

'मनोरंजन'चा हा पहिला मराठी दिवाळी अंक २२५ पानांचा होता आणि त्याची किंमत होती अवघा एक रुपया! बालकवींची 'आनंदी आनंद गडे .....' ही कविता प्रथम प्रसिद्ध झाली ती ह्या अंकातच. याशिवाय लक्ष्मीबाई टिळक, गो. वा. कानेटकर, माधवानुज, ना. वा. टिळक इत्यादी प्रसिद्ध साहित्यिकांचे लेख व कविता यांचा त्यांत समावेश असून महाराष्ट्रातील कर्ते पुरुष, वृत्तपत्रकार, महाराष्ट्र महिला-सुपुत्र, राजे-संस्थानिक, प्रसिद्ध किल्ले, कांही ग्रंथकार, प्रसिद्ध कवी, डॉक्टर्स, नाट्यकलेतील अनेक प्रसिद्ध पुरुष यांची चित्रे व माहिती असून डॉ. भांडारकर, मथुराबाई जोशी, दि. स. वर्दे, प्रा. गो. ची. भाटे, डॉ. कृष्णाबाई केळवलकर इत्यादींचे माहितीपूर्ण लेख आहेत. मराठी साहित्य संस्कृतीचा हा अमोल ठेवा या शतकमहोत्सवी वर्षात मराठी वाचकांना उपलब्ध व्हावा यासाठी 'लोकसत्ता - (१५ ऑक्टो. २००८) चे' प्रयत्न विशेष कारणीभूत आहेत. का. र. मित्र आजगांवकर यांच्या नावातील 'मित्र' या शब्दाचे कोडे या अंकातील 'अखेर कोडं सुटलं SS' या लेखाद्वारे श्री. श्री. बा. पाटील यांनी नुकतेच दिवंगत झालेल्या लेखक रविंद्र पिंगे यांच्या एका आठवणीतून स्पष्ट केले आहे.

प्रसिद्ध साहित्यिक कै. गुं. फ. आजगांवकर यांनी १९५४ साली प्रसिद्ध केलेल्या आपल्या 'आजगांव-दर्शन' या पहिल्या ग्रंथात आजगांव विषयी जी भौगोलिक आणि ऐतिहासिक माहिती दिली आहे त्यात मासिक मनोरंजनकार का. र. मित्र आजगांवकरांचा पुढीलप्रमाणे विस्तृत परिचय देऊन त्यांच्याविषयीचा आदर व्यक्त केला आहे.